महाराष्ट्र शासन

**विधि व न्याय विभाग**

# सन १९४९ चा मुंबई अधिनियम क्रमांक ४२

# मुंबई समाजबहिष्कार प्रतिबंध अधिनियम, १९४९

**(१५ ऑगस्ट २०१४ पर्यंत सुधारित)**

## Bombay Act No. XLII of 1949

# The Bombay Prevention of Ex-Communication Act, 1949

*(As Modified upto the 15th August 2014)*

व्यवस्थापक, शासकीय मध्यवर्ती मुद्रणालय, मुंबई यांनी भारतात मुद्रित केले आणि
संचालक, शासन मुद्रण व लेखनसामग्री महाराष्ट्र राज्य, मुंबई ४०० ००४ यांच्याद्वारे प्रकाशित

**२०१४**

[ **किंमत** : रुपये ६.००]

# मुंबई समाजबहिष्कार प्रतिबंध अधिनियम, १९४९.

---

## अनुक्रमणिका

**प्रस्तावना.**

**कलमे.**

१. लघुसंज्ञा व व्याप्ती.

२. व्याख्या.

३. समाज बहिष्कृत करणे हे वैध नसणे व त्याचा कोणताही अंमल नसणे.

४. शास्ति.

५. ह्या अधिनियमान्वये क्षेत्राधिकार

६. अपराधाची दखल घेण्याची रीत.

(शा.म.मु.) एच ४११० (६,०९७—१०-२०१४)

## सन १९४९ चा मुंबई अधिनियम क्रमांक ४२[१]

[मुंबई समाजबहिष्कार प्रतिबंध अधिनियम, १९४९][†]

**(२८ ऑक्टोबर १९४९ रोजी राज्यपालांची संमती मिळाल्यानंतर मुंबई शासनाचे राजपत्र भाग चार, यात दिनांक १ नोव्हेंबर १९४९ रोजी प्रथम प्रसिद्ध केलेला.)**

ह्या अधिनियमांत पुढील आदेशान्वये अनुकूलन व रूपभेद करण्यात आले आहेत :—

विधि अनुकूलन आदेश, १९५०,

मुंबई विधि अनुकूलन (राज्य व समवर्ती विषय) आदेश, १९५६.

## १९६० चा मुंबई अधिनियम क्रमांक २

महाराष्ट्र विधि अनुकूलन (राज्य व समवर्ती विषय) आदेश, १९६०.

**[२][मुंबई राज्यांत] समाज बहिष्कृत करण्यास प्रतिषेध करण्याबाबत अधिनियम.**

**ज्याअर्थी,** सरकारास असे दिसून आले आहे की, विवक्षित समाजात त्यांच्या जातीच्या इसमांना समाज बहिष्कृत करण्याची रूढी चालू आहे व ती कित्येक वेळा अशा रीतीने अनुसरण्यात येते की त्यामुळे त्या समाजातील इसमांस वैध हक्कांना व विशेष अधिकारांना मुकावे लागते ;

**आणि ज्याअर्थी,** बदलत्या काळास अनुसरून चालण्याकरिता आणि सार्वजनिक हिताच्या दृष्टीने ही रुढी बंद करणे इष्ट आहे; **त्याअर्थी** याअन्वये पुढीलप्रमाणे अधिनियम करण्यात आला आहे :—

**१.** (१) ह्या अधिनियमास मुंबई समाजबहिष्कार प्रतिबंध अधिनियम, १९४९ असे म्हणावे. लघुसंज्ञा व व्याप्ती.

[३][(२) तो संपूर्ण [४][महाराष्ट्र राज्यास] लागू आहे].

**२.** विषयात किंवा संदर्भात एतद्विरुद्ध काही नसल्यास, ह्या अधिनियमात,— व्याख्या.

(अ) "समाज" या संज्ञेचा अर्थ, ज्या गटाचे इसम जन्माने, धर्मांतराने किंवा कोणत्याही धार्मिक विधि करण्याने एकाच धर्माचे किंवा एकाच धार्मिक पंथाचे असतात व या कारणामुळे ज्याचा एकमेकांशी संबंध असतो त्या इसमांचा गट, असा समजावा आणि तीत जाती व पोट-जाती यांचा समावेश होतो;

(ब) "समाज बहिष्कृत करणे" या संज्ञेचा अर्थ, कोणत्याही समाजातील इसमास किंवा त्याच्या वतीने, असा इसम म्हणून दिवाणी स्वरूपाच्या दाव्याच्या सहाय्याने जे हक्क व विशेष अधिकार वैधरीत्या अंमलात आणता येतात ते हक्क व विशेष अधिकार त्याच्यापासून हिरावून घेऊन त्यास समाजातून काढून टाकणे, असा समजावा ;

---

१. उद्देश व कारणे यांचे निवेदन यासाठी पहा मुंबई शासनाचे **राजपत्र** १९४९, भाग पाच, इ. पृ. ४२४.

२. सन १९६० चा मुंबई अधिनियम क्रमांक २, कलम ३ द्वारे, " मुंबई प्रांतात " याऐवजी " मुंबई राज्यांत " हा मजकूर समाविष्ट करण्यात आला.

३. वरील अधिनियमाच्या कलम ४ द्वारे, हे पोट-कलम मूळ पोट-कलमाऐवजी दाखल करण्यात आले.

४. महाराष्ट्र विधि अनुकूलन (राज्य व समवर्ती विषय) आदेश, १९६० द्वारे ' मुंबई राज्य ' याऐवजी हा मजकूर समाविष्ट करण्यात आला.

† हा अधिनियम, मुंबई राज्याच्या उर्वरित भागास लागू असेल आणि अशा विस्तारामुळे, तो अंमलात येईल (पहा १९६० चा मुंबई अधिनियम क्रमांक २, कलम २).

**स्पष्टीकरण**.— ह्या कंडिकेच्या प्रयोजनांकरिता, दिवाणी स्वरूपाच्या दाव्याच्या सहाय्याने जो वैधरीत्या अंमलात आणता येतो अशा हक्कांत, पद किंवा मालमत्ता यासंबंधीचा हक्क किंवा कोणत्याही धार्मिक स्थानात पूजाअर्चा करण्याचा हक्क किंवा दफन अगर दहन यासंबंधीचा हक्क यांचा समावेश होतो— मग असा हक्क ठरविण्याची बाब ही कोणत्याही धार्मिक विधिसंबंधी किंवा समारंभासंबंधी प्रश्नांच्या निर्णयावर किंवा समाजाच्या नियमासंबंधी किंवा रूढीसंबंधी प्रश्नांच्या निर्णयावर सर्वस्वी अवलंबून असली तरी ती गोष्ट विचारात घेता कामा नये.

समाज बहिष्कृत करणे हे वैध नसणे व त्याचा कोणताही अंमल नसणे.

**३.** त्या त्या वेळी अंमलात असलेल्या कोणत्याही विधीत, वहिवाटीत किंवा रूढीत तद्विरुद्ध काहीही असले तरी, कोणत्याही समाजांतील इसमास समाज बहिष्कृत करणे हे वैध असणार नाही व ते कोणत्याही रीतीने परिणामक्षम असणार नाही.

शास्ति.

**४.** जे कोणतेही कृत्य एखाद्या समाजातील कोणत्याही इसमास समाज बहिष्कृत करण्याचे कृत्य म्हणून ठरते किंवा अशा इसमास समाज बहिष्कृत करण्यास सहाय्यभूत होते असे कृत्य जो कोणताही इसम करील त्यास, दोषी ठरविण्यात आले असता पराकाष्ठा एक हजार रुपये दंडाची शिक्षा होईल.

**स्पष्टीकरण**.—ज्या कोणत्याही इसमाने ह्या कलमाखालील अपराध केला आहे असे म्हणणे असेल तो इसम जर व्यक्तींची मिळून झालेली मंडळी किंवा संस्था असेल—मग ती संस्थापित असो वा नसो— आणि असा अपराध अशा मंडळीच्या किंवा संस्थेच्या सभेत घडला आहे असे म्हणणे असेल तर समाज बहिष्कृत करण्यासंबंधीच्या ठरावाच्या बाजूने ज्या कोणत्याही इसमाने मत दिले असेल त्या इसमाने अपराध केला आहे असे समजले पाहिजे.

ह्या अधिनियमान्वये क्षेत्राधिकार.

**५.** * दंड प्रक्रिया संहिता, १८९८ (१८९८ चा ५) यामध्ये काहीही असले तरी, प्रेसिडेन्सी फौजदारी न्यायाधिशांच्या किंवा पहिल्या वर्गाच्या फौजदारी न्यायाधिशाच्या न्यायालयाहून कनिष्ठ अशा कोणत्याही न्यायालयाने कलम ४ अन्वये शिक्षापात्र असलेल्या कोणत्याही अपराधाचा इन्साफ करता कामा नये.

अपराधाची दखल घेण्याची रीत.

**६.** कोणत्याही न्यायालयाने कलम ४ अन्वये शिक्षापात्र असलेल्या अपराधाच्या बाबतीत,–

(अ) ज्या तारखेस अपराध घडला असे म्हणणे असेल त्या तारखेपासून एक वर्षाची मुदत संपल्यानंतर त्याची दखल घेता कामा नये, तसेच

(ब) [१] [राज्य] सरकारच्या किंवा ज्या क्षेत्रात पोलीस आयुक्त नियुक्त करण्यात आले आहेत त्या क्षेत्रात [२] [ज्या क्षेत्रात पोलीस कमिशनर नियुक्त करण्यात आले आहेत त्या क्षेत्रात] पोलीस कमिशनर व इतरत्र जिल्हा फौजदारी न्यायाधीश यांच्या दर्जापेक्षा कमी दर्जा नसलेल्या अशा ज्या कोणत्याही अधिकाऱ्यास [१] [राज्य] सरकारने अधिकृत केले असेल त्या अधिकाऱ्याच्या पूर्व मंजुरीवाचून त्याची दखल घेता कामा नये.

---

* आता, पहा फौजदारी प्रक्रिया संहिता, १९७३ (१९७४ चा २).

[१] विधि अनुकूलन आदेश, १९५० द्वारे ‘ प्रांतिक ’ या मजकुराऐवजी हा मजकूर दाखल करण्यात आला.

[२] सन १९६० चा मुंबई अधिनियम क्रमांक २, कलम ५ द्वारे ‘ बृहन्मुंबईत ’ या मजकुराऐवजी हा मजकूर दाखल करण्यात आला.

शासकीय मध्यवर्ती मुद्रणालय, मुंबई